# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.02.2026** **वार-** बुधळवार

---

**खडसे**

खेळाडूंच्या केवळ सरावावर भर न देता, त्यांच्या आहार, मानसिक आरोग्य आणि शरीरशास्त्राचा वैज्ञानिक अभ्यास करून त्यांना जागतिक स्तरासाठी तयार करणं हे क्रीडा मंत्रालयाचं उद्दिष्ट आहे, असं केंद्रीय क्रीडा आणि युवा व्यवहार राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज पुण्यात सांगितलं.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं आयोजित 'वार्तालाप' कार्यक्रमात खडसे बोलत होत्या. खेळाडूची क्षमता ओळखण्यासाठी, वाढवण्यासाठी आणि दुखापतींपासून वाचण्यासाठी क्रीडा विज्ञानाचा वापर आता अनिवार्य झाला आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. क्रीडा विज्ञान तळागाळातील खेळाडूंपर्यंत पोहोचवण्यासाठी ग्रामीण भागातील प्रशिक्षक आणि शिक्षकांनाही ह्या तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे, असंही खडसे म्हणाल्या.

**स्थायीसमिती**

पुणे महापालिका स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भाजपतर्फे श्रीनाथ भिमाले यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भिमाले यांना निवडीचे पत्र सुपूर्द केलं. स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची निवडणूक येत्या सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता पार पडणार आहे. 16 सदस्य समितीमध्ये 13 सदस्य भाजपचे असल्यानं भिमाले यांची निवड निश्चित मानली जात आहे.

**<u>कार्यशाळा</u>**

पुणे शहरात लोकसहभागातून 2026 मध्ये रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेत चांगला बदल घडलेला दिसेल, असा विश्वास महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केला आहे. पुणे महापालिकेच्या वतीनं "पुण्यातील शहरी गतिशीलता" या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी आयुक्त बोलत होते. शहरातील वाहतूक व्यवस्था सक्षम, सुरक्षित आणि वेगवान करण्यासाठी महापालिकेकडून अल्पकालीन, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजना केल्या जाणार आहेत, असं राम यांनी सांगितलं. शहरात पुणेकरांची वाहतूक केवळ 50 टक्के असून उर्वरित वाहतूक ग्रामीण भागातून शहर मार्गे पुढे जाणारी असल्यामुळे वाहतुकीची समस्या उद्भवते. सध्या मेट्रो, रिंगरोड, मिसिंग लिंकची कामे सध्या सुरु आहेत, ही कामे पूर्ण झाल्यानंतर पुण्यात वाहतुकीचा प्रश्न उद्भवणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या निधीची नव्हे, तर एकात्मिकपणे कामाची गरज आहे, असं ते म्हणाले.

**<u>पुरस्कार</u>**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात 10 लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटात पिंपरी चिंचवड महापालिकेनं प्रथम क्रमांक पटकावून राज्यात अव्वल स्थान मिळविलं आहे. तसंच भूमी विषया अंतर्गत महापालिकेनं उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.

अभियान कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचं मूल्यांकन करण्यात आलं. पिंपरी चिंचवड महापालिकेनं पर्यावरण संरक्षण, हरित उपक्रम, कचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन, ऊर्जा बचत आणि जनजागृती यामध्ये प्रभावी कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला आहे.

**<u>हिंदवीस्वराज्यमहोत्सव</u>**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असलेल्या जुन्नर तालुक्यातल्या किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी, श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव: हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२६ या कार्यक्रमाचं आयोजन उद्या करण्यात आलं आहे. पुणे जिल्हा प्रशासन आणि पर्यटन विभाग यांनी संयुक्तपणे या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. छत्रपती शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देणारे सांस्कृतिक, क्रीडा आणि लोककलेचे विविध उपक्रम या महोत्सवाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहेत. सकाळी शिवकालीन मर्दानी खेळांचे चित्तथरारक सादरीकरण, महिला बचत गटांचे प्रदर्शन आणि खाद्य महोत्सव, आणि सायंकाळी ५ वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. छत्रपती शिवरायांच्या महाआरतीनं आणि बहुरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांनी या महोत्सवाची सांगता होणार आहे, अशी माहिती पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी दिली आहे.

**<u>पदयात्रा</u>**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उद्या पुण्यात पदयात्रा काढण्यात येणार आहे. युवा व्यवहार आणि खेळ मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्यात हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या पदयात्रेची सुरुवात सकाळी ८ वाजता शनिवारवाड्यासमोरील प्रांगणातून होणार असून सांगता एस.एस.पी.एम.एस. शाळेसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून होणार आहे.

**<u>महाराष्ट्रकेसरी</u>**

राज्याच्या क्रीडा विश्वात मानाच्या समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचं यजमानपद यंदा पुण्याला मिळालं आहे. वाघोली मध्ये 18 ते 22 मार्च दरम्यान विविध वजनी गटात ही स्पर्धा होणार आहे. याबरोबरच 68 वी वरिष्ठ गट माती आणि गादी प्रकारातली राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धाही होणार

आहे. स्पर्धेत 42 शहरातले  जवळपास 840 कुस्तीगीर सहभागी होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे विजेत्याला मल्ल मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ एक किलो चांदीची गदा देण्यात येणार असून इतर गटातील कुस्तीगिरांना रोख पारितोषिकं देण्यात येणार आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!**